


Scanned by CamScanner

**वाचले :** १. महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम २०१४

२. म.जिल्हाधिकारी जळगांव यांचे आदेश क्रं.जमीन/१०९२/एसआर/१५३/९२ दिनांक -२३/१२/१९९२

३. तहसिलदार चाळीसगांव यांचेकडील आदेश नं एलएनए/एसआर/३२/८६ दि.२४.०७.८६

४. श्री./श्रीमती. गोरखनाथ रामदास पाटील व इतर१ रा.टाकळी प्र चा ता.चाळीसगांव जि.जळगांव यांचा दि.२६.१२.२०१८ रोजीचा अर्ज.

५. सहाय्यक संचालक नगर रचना, जळगांव जा.क्र.बाधं.पर./मौजे टाकळी प्र चा ता.चाळीसगांव/ग.नं. २/३/४+३/२/३ मधील भुखंड क्रं.०४/ससं-जळ/७६२ दिनांक:०७.०३.२०१९

६. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४ दि.२९.१२.२०१४ अन्वये करण्यात आलेली सुधारणा

---

क्रमांक/जमीन/बांधप/कावि/८६/२०१८
उपविभागीय अधिकारी चाळीसगांव भाग
दिनांक: १७/०५/२०१९

चलग-२
३८८५ | २८-८८ | २०१९

**आदेश :**

अर्जदार श्री./श्रीमती. गोरखनाथ रामदास पाटील व इतर १ रा.चाळीसगांव ता.चाळीसगांव जि.जळगांव यांचा दि.२६.१२.२०१८ रोजीचा अर्ज मौजे टाकळी प्र चा ता.चाळीसगांव येथील ग.नं. ३/२+३+४ मधील भुखंड क्रं २+३+४ क्षेत्र ५६२.५० चौ.मी. या क्षेत्रावर बांधकाम करणेसाठी टि.पी.अॅक्ट १९६६ मधील कलम ४५/६९ व महाराष्ट्र म्युनिसिपल अॅक्ट अन्वये इमारत रचना स्थापन करुन बांधण्यास आरंभ परवानगी व मंजुरी मिळणेंस विंनती केली आहे.

**<u>सदर अर्जाची चौकशी केली असता खालील गोष्टी निष्पन्न झालेल्या आहेत.</u>**

१. इमारत बांधकाम परवानगी मागणी केलेल्या क्षेत्रास बिनशेती परवानगी प्राप्त झालेली आहे.

२. इमारत बांधकाम परावनगी मागणी केलेले क्षेत्र नगरपालिका चाळीसगांव यांचे हद्दीबाहेर असुन अद्याप त्यावर बांधकाम झालेले नाही. तसेच अर्जदार यांनी सदर क्षेत्र मोजणीसाठी मोजणी फी भरलेली आहे.

३. इमारत बांधकाम परवानगी मागणी केलेल्या क्षेत्राच्या अभिन्यासानुसार सहाय्यक संचालक नगर रचना, जळगांव जा.क्र.बाधं.पर./मौजे टाकळी प्र चा ता.चाळीसगांव/ग.नं. २/३/४+३/२/३ मधील भुखंड क्रं.०४/ससं-जळ/७६२ दिनांक:०७.०३.२०१९ मंजुरीस शिफारस केलेली आहे.

४. उद्योग उर्जा व कामगार विभागाकडील शासन निर्णय क्रं.बिएसए-२००९/प्र.क्रं.१०८/कामगार-७ दिनांक: १७/०६/२०१० नुसार विषयांकीत भुखंडाचे बांधकाम क्षेत्र **भुखंड क्रं. २+३+४ क्षेत्र ५६२.५० चौ.मी. पैकी ५४९.९१ चौ.मी** साठी अर्जदार यांनी बांधकाम क्षेत्रावर १ टक्का उपकर रक्कम रुपये ११९४५/- दिनांक : २९.०३.२०१९ रोजी चलनाने बँक ऑफ इंडीया शाखा चाळीसगांव येथे जमा केलेला आहे.

उपरोक्त निष्पन्न झालेल्या बाबीवरुन मी उपविभागीय अधिकारी चाळीसगांव भाग, चाळीसगांव उपोद्घातात अनुक्रमांक दोन अन्वये प्रदान केलेल्या अधिकारान्वये खालील शर्ती व अटींवर बांधकाम परवानगी देत आहे.

**शर्ती :**

१. इमारत बांधकामामुळे अगर त्यांच्या साहित्यामुळे सार्वजनिक रहदारीस अडथळा ची अडचण निर्माण करता कामा नये.

२. इमारत व इमारतीच्या भागाचा भोगवटा वापर किंवा उपयोग भोगवटा परवानगी मिळविल्याखेरीज घेता येणार नाही.

३. इमारत आरंभ परवानगी बाबतचे सदरचे आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकपासुन एक वर्षाच्या कालवधीसाठी परिणामकारक राहील. एक वर्षाचे कालावधी नंतर सदरचे आदेश निष्कषीत होतील.

Scanned by CamScanner

४. इमारत बांधकाम परवानगी मंजुर करण्यात आलेल्या क्षेत्राचे रस्ता व गटारीचे बांधकाम स्वखर्चाने करावे, न.पा. हद्दीत बांधकाम क्षेत्राचा समावेश झाल्यास संबंधीत न.पा.स हस्तांतर करावे.

५. इमारतीचा वा इमारतीचे भागाचा उपयोग पूर्णत्व प्रमाणपत्र सक्षम अधिका-याकडुन घेतल्याशिवाय करू नये.

६. पुर्णत्वाचे प्रमाणपत्रासाठी अर्ज करतांना त्यासोबत इमारत बांधणी रचना स्थैर्य स्थिरता शास्वती प्रमाणपत्र अर्किटेक्ट इंजिनियर यांचे प्रमाणपत्र जोडावे.

७. बांधकामाच्या ठिकाणी डिस्प्ले बोर्ड लावणे त्यावर खालीलप्रमाणे तपशील नमुद करणे.

अ) जागा मालक यांचे डेव्हलपरचे वास्तुशास्त्राचे आणि कॉन्ट्रेक्टरचे नांव व पत्ते, स.नं./सि.स./ वार्ड नं.इ.भूखंडाचा तपशील.

ब) बांधकाम परवानगीचे क्रमांक व दिनांक.

क) अनुज्ञेय करण्यात आलेले बांधीव क्षेत्र.

ड) निवासी गाळयांची वाणिज्य खालील गाळयांची संख्या व क्षेत्र.

८. परवानगी देण्यात आलेल्या क्षेत्राची आखणी योग्य त्या सक्षम अधिका-याकडुन करुन घ्यावी.

९. इमारत बांधाकाम सुरु केल्याबाबत व संपल्याबाबत संबंधीत तहसिलदार यांना कळवावे.

१०. शासन परीपत्रक टि.पी.एस.३६७१/१११२४/डी.डब्ल्यु./२,दि.३०/०७/१९९१ मधील शर्ती व टेबल क्र. ३ अ.ज.३ मधील साईजोचे पालन करावे.

११. भूकंप विरोधक व्यवस्था अर्जदार यांनी करणे बंधनकारक आहे.

१२. रेनवाटर हारवेस्टीग सिस्टीमची (Rain Water Harvesting system) करणे अर्जदारास बंधनकारक

१३. इमारतीचे बांधकाम करतांना बांधकाम साहित्यात (फ्लाय अॅश आधारीत साहित्याचा वापर करावा).

चलग-२ 3844 २५-८ २०१९

उपविभागीय अधिकारी
चाळीसगांव भाग, चाळीसगांव

प्रत : श्री./श्रीमती. गोरखनाथ रामदास पाटील व इतर १ रा.चाळीसगांव ता.चाळीसगांव जि.जळगांव यांना माहि
प्रत : तहसिलदार चाळीसगांव यांचेकडेस माहितीसाठी.
प्रत : मुख्याधिकारी नगरपरिषद, चाळीसगांव यांना माहितीसाठी.

उपविभागीय अधिकारी
चाळीसगांव भाग, चाळीसगांव

SUB-DIVISIONAL OFFICER उपविभागीय अधिकारी चाळीसगांव भाग चाळीसगांव CHALISGAON DIV DIST JALGAON

THE SEAL OF THE JOINT REGISTRAR चाळीसगांव -2 2-CHALISHGAON

Scanned by CamScanner